# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

<u>प्रसिद्धी पत्रक                                   ता. १८ नोव्हेंबर २०१९</u>

# मध्यवर्ती कारागृह येथे आरोग्य तपासणी शिबिर

## मनपाच्या आरोग्य विभागाचे आयोजन : ३८८ कैद्यांनी घेतला लाभ

**नागपूर, ता. १८ :** नागपूर महानगरपालिका आरोग्य विभाग रुग्णसेवेसाठी निरंतर प्रयत्न करीत आहे. या अनुषंगाने १६ नोव्हेंबरला मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत कैद्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते

कारागृहातील ३८८ कैद्यांनी शिबिराचा लाभ घेतला. लाभार्थ्यांपैकी ३२२ पुरुष व ६६ महिला होत्या. कारागृहामध्ये आरोग्य सेवा असतात. परंतु बदलत्या जीवनमानानुसार नवनवीन उपचार आणि तपासण्या करण्याची गरज भासत असते. नागपूर महानगरपालिकेच्या पुढाकाराने, सोमलवाडा आणि जयताळा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या हद्दीत असणाऱ्या कारागृहातील कैद्यांसाठी सदर आरोग्य तपासणी शिबिर आयोजित

करण्यात आले होते. महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी, टाटा ट्रस्टद्वारे कार्यरत असणाऱ्या आरोग्य आणि सामाजिक कार्य ह्या विषयांवर काम करणाऱ्या चमूच्या सहकार्याने ह्या शिबिराचे नियोजन केले होते. सामान्य जनतेस उपलब्ध असणाऱ्या सेवा आणि एम्स नागपूर ह्या वैद्यकीय महाविद्यालयातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन कारागृहामध्ये देखील सुरु व्हावे, अशा भावनेतून हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे.

शिबिराचे आयोजन महानगरपालिकेच्या आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. भावना सोनकुसळे, आरोग्य अधिकारी डॉ. सरिता कामदार, नागपूर कारागृहाचे अधीक्षक श्री. कुमरे, एम्स नागपूरच्या संचालक मेजर जनरल डॉ विभा दत्ता आणि टाटा ट्रस्टचे प्रकल्प प्रमुख अमर नवकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. ह्यावेळी टाटा ट्रस्टचे धनपाल मेश्राम, श्री. डोंगरें, डॉ. दीपलता नारनवरे, लक्ष्मण शिंदे आणि डॉ शिवम शर्मा, मनपातील एनयुएचएम समन्वयक दिपाली नागरे, एनयुएचएम शहर प्रकल्प व्यवस्थापक डॉ.पुरवली काटकर ह्यांनी मोलाचे सहकार्य केले.